Shri Sharda Bhavan Education Society's
Shankarrao Chavan Mahavidyalaya, Ardhapur.
NATIONAL SERVICE SCHEME
Report on Fundraising for Flood Victims
**Nagpur Road Ardhapur, Tq. Ardhapur, Dist. Nanded-431602 M. S. India**
(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

---

## ❖ पूरग्रस्तांसाठी मदत निधी संकलन उपक्रमाचा अहवाल

**महाविद्यालयाचे नाव:** शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर.
**विभाग:** राष्ट्रीय सेवा योजना
**दिनांक:** ०१ ऑक्टोबर २०२५
**वेळ:** ११.०० सकाळी.
**ठिकाण:** अर्धापूर शहर.

**प्रस्तावना:**




महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे अनेक नागरिक, शेतकरी आणि सामान्य लोक प्रभावित झाले. या सामाजिक संकटाच्या पार्श्वभूमीवर, महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी पूरग्रस्तांसाठी निधी गोळा करण्यासाठी पुढाकार घेतला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. करुणा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. काजी मुख्तारउद्दीन आणि प्रा. डॉ. नीलकंठ लांडे यांच्या नेतृत्वाखाली हा





उपक्रम राबविण्यात आला. सर्व स्वयंसेवक विद्यार्थी सकाळी १० वाजता सेमिनार हॉलमध्ये जमले. तेथे कार्यक्रम अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि निधी संकलनाची रूपरेषा आखली. त्यानंतर, सकाळी ११.०० वाजता विद्यार्थी अर्धापूर शहरातील

बाजारपेठेत गेले आणि नागरिकांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी मनापासून योगदान दिले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी जागरूकता निर्माण केली आणि सामाजिक जबाबदारीचे महत्त्व सांगितले. या उपक्रमाद्वारे गोळा होणारा निधी पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी दान केला जाईल.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, जबाबदारीची भावना आणि सेवेची भावना निर्माण झाली.

**उद्दिष्ट :**

पूरग्रस्तांना तात्काळ मदत मिळावी, त्यांच्यासाठी शैक्षणिक साहित्य व कपडे खरेदीसाठी निधी गोळा करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.




**कार्यक्रमाचे वर्णन :**

**दिनांक:** 01 ऑक्टोबर 2025.

**स्थळ:** अर्धापूर शहर

**सहभागी स्वयंसेवक:** 70

**कार्यक्रम अधिकारी:** डॉ. एम. के. काझी डॉ. एन. डी.लांडे.

स्वयंसेवकांनी बाजारपेठेत व सरकारी संस्थांमध्ये भेट देऊन लोकांना पूरग्रस्तांच्या परिस्थितीची माहिती दिली. त्यांनी घराघरांत जाऊन निधी संकलन केले. काही ठिकाणी बॅनर, पोस्टर व फलकांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात केली.

**संकलित निधी:**

या उपक्रमात एकूण रुपये 36840 इतका निधी अवघ्या दोन तासात जमा झाला. हा निधी प्रत्यक्ष पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सुपूर्द करण्यात आला.



**निष्कर्ष:**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी समाजभावना, जबाबदारी आणि सेवा वृत्तीचे उत्तम उदाहरण घालून दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदनशीलता आणि एकात्मतेची भावना दृढ झाली.

**आभार:**

या कार्यात सहकार्य करणाऱ्या सर्व नागरिकांचे, प्राध्यापकांचे आणि स्वयंसेवकांचे मनःपूर्वक आभार.




आपलं जगमित्र
नांदेड

# शंकरराव चव्हाण महाविद्यालयाच्या वतीने पूरग्रस्तांसाठी निधी संकलन



नांदेड (प्रतिनिधी) सध्या महाराष्ट्रामध्ये पूर परिस्थिती गंभीर झालेली आहे. विशेषतः नांदेड जिल्ह्यामध्ये अनेक भागामध्ये भयंकर पूर परिस्थिती झाली आहे. या पूरग्रस्तांच्या मदतीसाठी शंकरराव चव्हाण महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेव कांच्यावतीने पूरग्रस्तांना मदत व्हावी यासाठी शहरामध्ये पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मदत रॅलीचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.करुणा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व सूचनेनुसार करण्यात आले होते. या रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी २५०००, एवढी रक्कम पूरग्रस्तांच्या मदतीसाठी फुल नाही फुलाची पाकळी म्हणून अवघ्या दोन तास शहरात फिरून जमा केली. राष्ट्रीय सेवा योजनेचे सत्तर स्वयंसेवक व स्वंसेविका आणि महाविद्यालयातील प्राध्यापक यामध्ये सहभागी झाले होते.या मदतीमध्ये प्राचार्य व प्राध्यापक यांनीही योगदान दिले. तसेच गावभर लोकांनी उस्फुर्त सहकार्य केले. निधी जमा करून एक सामाजिक दायित्व पूर्ण करून, आपल्या समाजातील माणसांसाठी आपण मदत केली पाहिजे हा संदेश दिला. यातून विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव झाली. भविष्यात हे विद्यार्थी मोठे होऊन मोठ मोठ्या पदावर जातील अधिकारी होतील, राजकीय नेते होतील त्यांच्यामध्ये त्यांचे अंगी सामाजिक गुण विकसित करण्याचे काम विकसित करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना आहे. अशा सामाजिक कार्यातून प्रत्यक्षपणे सामाजिकतेचे बीज विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रोवली जातात. हा निधी संकलन करण्यासाठी डॉ.काजी मुख्तारोद्दिन, प्रा.डॉ.निळकंठ लांडे, माजी कार्यक्रमाधिकारी डॉ.रघुनाथ शेटे, डॉ.जे.सी.पठाण, डॉ साईनाथ शेटोड, डॉ.लक्ष्मण वाघमारे, डॉ.संगीता घुगे, डॉ.कदम के.के., डॉ.निरंजन गिरी, डॉ.पवार मनिषा, डॉ.व्ही.बी. लोणे, डॉ.पूजा पतंगे, प्रा.स्वानंद शिंदे, सदाशिव शिनगारे, बालाजी कवठेकर यांनी रॅलीमध्ये सहभाग घेऊन. लोकांना आवहान करून सदर निधी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी जमा केला.

हिंगोली,परभणी,नांदेड,बीड जिल्ह्यातून स्वतंत्रपणे प्रकाशित होणारे विभागीय पातळीवरील दैनिक
गाववाला
संस्थापक संपादक : उत्तमराव दगडू
R.N.I No. MAH MAR/2013/49618 gmail:gaonwaladaily@gmail.com ८ पाने
नांदेड | वर्ष १३ वे अंक क्रं.१६६ | शनिवार दि.४ ऑक्टोबर २०२५ | किंमत ३ रु.

# अर्धापूरात शंकरराव चव्हाण महाविद्यालयाच्यावतीने पूरग्रस्तांसाठी गावभर फिरून जमा केला मदत निधी



अर्धापूर/गुणवंत विरकर

सध्या महाराष्ट्रामध्ये पूर परिस्थिती गंभीर झालेली आहे. विशेषतः नांदेड जिल्ह्यामध्ये अनेक भागामध्ये भयंकर पूर परिस्थिती झाली आहे. या पूरग्रस्तांच्या मदतीसाठी शंकरराव चव्हाण महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकांच्यावतीने पूरग्रस्तांना मदत व्हावी यासाठी शहरामध्ये पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मदत रॅलीचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.करुणा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व सूचनेनुसार करण्यात आले होते. या रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी २५000, एवढी रक्कम पूरग्रस्तांच्या मदतीसाठी फुल नाही फुलाची पाकळी म्हणून अवघ्या दोन तास शहरात फिरून जमा केली. राष्ट्रीय सेवा योजनेचे सत्तर स्वयंसेवक व स्वंसेविका आणि महाविद्यालयातील प्राध्यापक यामध्ये सहभागी झाले होते.

या मदतीमध्ये प्राचार्य व प्राध्यापक यांनीही योगदान दिले. तसेच गावभर लोकांनी उस्फुर्त सहकार्य केले. निधी जमा करून एक सामाजिक दायित्व पूर्ण करून, आपल्या समाजातील माणसांसाठी आपण मदत केली पाहिजे हा संदेश दिला. यातून विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव झाली. भविष्यात हे विद्यार्थी मोठे होऊन मोठ मोठ्या पदावर जातील अधिकारी होतील, राजकीय नेते होतील त्यांच्यामध्ये त्यांचे अंगी सामाजिक गुण विकसित करण्याचे काम विकसित करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना आहे. अशा सामाजिक कार्यातून प्रत्यक्षपणे सामाजिकतेचे बीज विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रोवली जातात. हा निधी संकलन करण्यासाठी डॉ. काजी मुख्तारोद्दिन, प्रा.डॉ. निळकंठ लांडे, माजी कार्यक्रमाधिकारी डॉ.रघुनाथ शेटे, डॉ.जे.सी. पठाण, डॉ साईनाथ शेटोड, डॉ.लक्ष्मण वाघमारे, डॉ.संगीता घुगे, डॉ.कदम के.के., डॉ.निरंजन गिरी, डॉ.पवार मनिषा, डॉ.व्ही. बी. लोणे, डॉ.पूजा पतंगे, प्रा. स्वानंद शिंदे, सदाशिव शिनगारे, बालाजी कवठेकर यांनी रॅलीमध्ये सहभाग घेऊन. लोकांना आवहान करून सदर निधी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी जमा केला.







| **कार्यक्रम अधिकारी** | **कार्यक्रम अधिकारी** | **प्राचार्य** |
|---|---|---|
| ( राष्ट्रीय सेवा योजना ) | (राष्ट्रीय सेवा योजना ) | शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर. |
| डॉ. एम. के. काझी | डॉ. एन. डी.लांडे | डॉ. करुणा देशमुख |